९३/५

राज्यातील कौशल्य विकास कार्यक्रमाकरीता स्थापना करण्यांत आलेल्या राज्यस्तरीय कौशल्य विकास कार्यकारी समितीची रचना करणेबाबत..

C-53

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्र.कौविका-२०१०/(१४२/२०१०)/व्यशि-५

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : ०९ मे, २०११.

पहा : १. शासन निर्णय क्रमांक कौविका-२०१०/(३/१०)/व्यशि-५, दिनांक १९ मे २०१०.

२. मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ६/९/२०१० रोजी पार पडलेली राज्य कौशल्य कार्यकारी समितीची बैठक.

३. सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.संकिर्ण-१००७/५४६/१८(र. व का.), दिनांक ८ सप्टेंबर २०१०.

**प्रस्तावना-** संदर्भाधीन क्रमांक १ च्या शासन निर्णयानुसार राज्य कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्य कौशल्य शिखर परिषद व मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्य कौशल्य विकास कार्यक्रम कार्यकारी समितीची स्थापना करण्यांत आली आहे.

२. मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील दिनांक ६/९/२०१० रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार राज्य कौशल्य कार्यकारी समितीत, कौशल्य विकास कार्यक्रम राबविणाऱ्या अन्य विभागांचे प्रधान सचिव / सचिव यांचा सदस्य म्हणून समावेश करण्याचा निर्णय घेण्यांत आला. त्याअनुषंगाने राज्य कौशल्य विकास कार्यकारी समितीतील शासनाच्या अन्य कांही विभागांचे प्रधान सचिव / सचिव यांचा तसेच इतर कांही तज्ञांचा सदस्य म्हणून सदर समितीत समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :- उपरोक्त पार्श्वभूमीवर राज्य कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत राज्य कौशल्य विकास कार्यक्रम कार्यकारी समितीत खालील नमुद केलेल्या सदस्यांचा समावेश करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. सदर समितीची कार्यकक्षा दिनांक १९ मे २०१० च्या शासन निर्णयामध्ये नमुद केल्याप्रमाणेच राहील.

५९

## कौशल्य विकास कार्यक्रम कार्यकारी समिती

| | | |
|---|---|---|
| १ | सचिव, आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| २ | सचिव, कृषि विभाग | सदस्य |
| ३ | सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| ४ | सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग | सदस्य |
| ५ | सचिव, महिला व बाल कल्याण विकास विभाग | सदस्य |
| ६ | सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग | सदस्य |
| ७ | सचिव, सहकार व वस्त्रोद्योग विभाग | सदस्य |
| ८ | कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई | सदस्य |
| ९ | कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्र शिक्षण विद्यापीठ, लोणेरे | सदस्य |
| १० | **व्यवसाय शिक्षण तज्ञ** :- डॉ. स्वाती मुजुमदार, प्रधान संचालिका, सिम्बॉयसिस ओपन एज्युकेशन सोसायटी, पुणे. | सदस्य |
| ११ | **तंत्र शिक्षण तज्ञ** :- श्री. प्रतापराव बोराडे, प्राचार्य, जवाहरलाल नेहरु अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद. | सदस्य |
| १२ | **उच्च शिक्षण तज्ञ** :- श्री. समीर सोमय्या, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, गोदावरी बायोरिफायनरी लि., मुंबई. | सदस्य |
| १३ | **कृषि तज्ञ** :- श्री. पोपटराव पवार, सरपंच, हिवरे बाजार, ता.जि.अहमदनगर. | सदस्य |

**निमंत्रक**

**आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास**

संदर्भ क्रमांक ३ च्या शासन निर्णयानुसार सचिव, रोजगार व स्वंयरोजगार हे पद रद्द करण्यांत येऊन त्या विभागाचे कामकाज त्यांच्या क्षेत्रीय यंत्रणेच्या कामकाजासह सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभागा यांच्याकडे सोपविण्यांत आलेले आहे. सबब राज्य कौशल्य विकास कार्यकारी समितीमध्ये सचिव, रोजगार व स्वंयरोजगार यांचे सदस्यत्व रद्द करण्यांत येत आहे.

त्याचप्रमाणे संदर्भ क्रमांक ४ च्या शासन निर्णयान्वये "आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार" यांचे पदनाम "आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास" असे सुधारीत करण्यांत आले आहे. त्यामुळे सदर समितीचे निमंत्रक म्हणून संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्याऐवजी आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार यांचा समावेश करण्यांत येत आहे.

दिनांक १९ मे २०१० च्या शासन निर्णयामधील कार्यकारी समितीची कार्यकक्षा मधील मुद्दा क्रमांक ५ (२) मधील बाल कामगार या शब्दाऐवजी "बाल कामगारांचे पालक" अशी सुधारणा करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सीमा ढमढेरे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
मा.मुख्यमंत्री / मा.उप मुख्यमंत्री व सर्व संबंधित मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव
मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
सर्व संबंधित प्रशासकीय विभागांचे प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास, कोकण भवन, नवी मुंबई
उपरोक्त समितीमधील सर्व शासकीय सदस्य. [संबंधित सदस्य सचिव यांचेमार्फत पत्राने]
उपरोक्त समितीमधील सर्व अशासकीय सदस्य. [संबंधित सदस्य सचिव यांचेमार्फत पत्राने]
संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहसंचालक/उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई / पुणे / नागपूर / अमरावती / औरंगाबाद / नाशिक [संचालक (प्रशिक्षण) यांचेमार्फत]
महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
कार्यासन अधिकारी (साशि-१), उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
कार्यासन अधिकारी, व्यशि-१,२,३,४,
निवड नस्ती/व्यशि-५

C-56